[विशेष--ध. आ./ मुं. सा. वि./५०म.

№ 32379

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/३५८६/सांगली

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, स्वकुळ साळी समाजसेवा मंडळ, सांगली

...लील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१ )अन्वये योग्यरित्या ...दणी करण्यात आली.

तारीख ११-११-१९८२ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

REGISTRAR OF SOCIETIES SANGLI AREA सांगली क्षेत्र

संस्थांचे सहायक निबंधक,

सहाय्यक संस्था निबंधक विभाग.

सांगली क्षेत्र, सांगली

TRUE COPY

Vice - Principal (PW),
Walchand College of Engineering
SANGLI.

---

[ विशेष/ध.आ./मु.सा.वि./२ मं.

## नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये सांगली विभाग, सांगली येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव स्वकुळसाळी समाजसेवा मंडळ, सांगली

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक एफ ३५५० (सांगली) श्री. दिनकर गंगाराम उंडाळ यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक ५-२-१९९३ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का धर्मादाय सहायक आयुक्त सांगली विभाग सांगली

सही

पदनाम सहाय्यक धर्मादाय आयुक्त सांगली विभाग, सांगली.

TRUE COPY

Vice - Principal (PW),
Walchand College of Engineering
SANGLI.

नक्कल मागणी अर्ज दि. २२.११.९२
नक्कल तयार दि. २४.११.९२.
नक्कल दिलेचा दि. २५.११.९२
नक्कल फी मिळालेचा दि. २५.११.९२.

छायांकित

अधीक्षक २८/११/९२

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सांगली विभाग, सांगली.

परिशिष्ट - अ

स्वकुळसाळी समाजसेवा मंडळ, सांगली, जि. सांगली या संस्थेचे ज्ञापन.

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये
नोंदणी क्रमांक 13548 /सांगली.
दिनांक - २१ ११ ८२

## मेमोरेंडम ऑफ असोसिएशन.

१. संस्थेचे नांव :- स्वकुळसाळी समाजसेवा मंडळ, सांगली.

२. संस्थेच्या कार्यालयाचा प-ता :- व्दारा चंद्रकांत मारुती पोर्टे,
१०८७/क/१ब, ~~गणेशनगर~~, पेठभाग
~~क्रॉस रोड नं.२~~, सांगली.
शिवनेरी कोल्हापूरकर.

३. संस्थेचे उद्देश :-

१] समाजातील गरीब, अनाथ, अपंग व्यक्तींना पुस्तके वाटप, कपडे वाटप करणे, वैद्यकीय सोयी उपलब्ध करुन देणे तसेच त्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी आर्थिक सहाय्य देणे.

२] समाजाची बौध्दीक, शारीरीक उन्नती व्हावी यासाठी व्यायामशाळा व वाचनालय चालविणे.

३] व्याख्याने, व्याख्यानमाला, चर्चासत्रे, परिसंवाद, प्रदर्शने यांचे आयोजन करणे.

४] पाणपोई चालविणे.

५] सांस्कृतीक भवन बांधणे.

६] समाजाचे सर्वांगीण उन्नतीसाठी शैक्षणिक, सांस्कृतीक व सामाजीक कार्य करणे.

७] समाजाकरीता शासनाच्या असलेल्या योजनांची त्यांना माहिती देवून मार्गदर्शन करणे.

८] दारुबंदी, हुंडाबंदी, कुटूंब नियोजन, वृक्षारोपण या सारख्या शासकीय योजनांचा प्रसार व प्रचार करणे.

४. स्वकुळसाळी समाजसेवा मंडळ, सांगली, जि. सांगली या संस्थेच्या नियम व नियमावलीनुसार ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यांत आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नांवे, प-ते, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | संपूर्ण नांव व पत्ता | हुद्दा | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. दिनकर गंगाराम डहाके, २ तारा कॉम्प्लेक्स, १२७५ पंचमुखी मारुतीरोड, सांगली. | अध्यक्ष | ३७ | भारतीय | नोकरी |
| २. | श्री. हणमंतराव ज्ञानदेव शिंगारे, सुखकर्ता, कत्तल खान्यासमोर धामणीरोड, सांगली. | उपाध्यक्ष | ५६ | -"- | नोकरी |
| ३. | कु. अस्मा पांडुरंग ठोके, ४४, गव्हर्मेंट कॉलनी स्कीम नं. ३, विश्रामबाग, सांगली. | कार्यवाह. | २२ | ४४,-"- | घरकाम समाजकार्य. |
| ४. | श्री. रघुनाथ पांडुरंग बडवे, सी/२/९, शासकीय निवासस्थान, मधुबन हॉटेल जवळ, सांगली. | खजिनदार | ५४ | -"- | इंजिनिअर. |
| ५. | श्री. सदाशिव सोनाप्पा चौधरी, चौधरी बंगला, रेव्हून्यू कॉलनी, सांगली. | सदस्य. | ६५ | भारतीय | व्यापार. |
| ६. | श्री. चंद्रकांत मारुती पोटे, १५४५, गणेशनगर, क्रॉस रोड नं. २, सांगली. | सदस्य. | ४२ | -"- | व्यापार. |
| ७. | श्री रघुनाथ रामचंद्र पोटे, "प्रसाद" गणेशनगर, घर नं. १५३३, सांगली. | सदस्य. | ४५ | -"- | व्यापार. |
| ८. | श्री. पांडुरंग गणपती भंडारे, घर नं. ३३१, भावेवाडा, गांवभाग, सांगली. | सदस्य. | ५७ | -"- | नोकरी. |
| ९. | श्री. गणपती बाबूराव कनोजे, घर नं. ३१०, मंगळवारपेठ, माधवनगर, जि. सांगली. | सदस्य | ६० | -"- | पेन्शनर. |
| १०. | श्री रामचंद्र गोविंद मांडवेकर, माळभाग, सांगली अर्बन बँकेशजारी, बुधगांव, ता. मिरज, जि. सांगली. | सदस्य | ६६ | -"- | पेन्शनर. |
| ११. | सौ. कुसुम जगन्नाथ उपरे, मंजिरी अपार्टमेंट, ३६०अ, राधाकृष्ण वसाहत, सांगली. | सदस्य | ५१ वर्षे | -"- | घरकाम, समाजकार्य. |

५. आम्ही खालील सह्या करणारे स्वकुळसाळी समाजसेवा मंडळ, सांगली जि. सांगली चे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत असलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन "स्वकुळसाळी समाजसेवा मंडळ, सांगली, जि. सांगली" ही संस्था दि. ११-०६-१९९२ रोजी स्थापन केली असून ती संस्था, संस्था

नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करणेसाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र. | सभासदाचे पूर्ण नांव व पत्ता | सही |
|---|---|---|
| १. | श्री दिनकर गंगाराम डहाके, २ तारा कॉम्प्लेक्स, १२७५, पंचमुखी मारुती रोड, सांगली. | |
| २. | श्री. हणमंतराव ज्ञानदेव शिंगारे, सुखकर्ता, कत्तल खान्यासमोर, धामणीरोड, सांगली. | |
| ३. | कु. अरुणा पांडुरंग ठोके, ४४, गव्हर्मेंट कॉलनी, स्कीम नं. ३, विश्रामबाग, सांगली. | |
| ४. | श्री. रघुनाथ पांडुरंग बडवे, सी/२/९, शासकीय निवासस्थानह मधुबन हॉटेलजवळ, सांगली. | |
| ५. | श्री. सदाशिव सोनाप्पा चौधरी, चौधरी बंगला, रेव्हून्यू कॉलनी, सांगली. | |
| ६. | श्री. चंद्रकांत मारुती पोटे, १५४५, गणेशनगर, कॉलेजरोड नं२, सांगली. | |
| ७. | श्री. रघुनाथ रामचंद्र पोटे, "प्रसाद" गणेशनगर, घर नं. १५३३, सांगली. | |
| ८. | श्री. पांडुरंग गणपती भंडारे, घरनं. ३३१, भावेवाडा, गांवभाग, सांगली. | |
| ९. | श्री. ~~कस्तुरस्य~~ गणपती बाबूराव कनोजे, घरनं. ३१०, मंगळवारपेठे, माधवनगर, जि. सांगली. | |
| १०. | श्री. रामचंद्र गोविंद मांडवेकर, माळभाग, सांगली अर्बन बँकेशेजारी, बुधगांव, जि. सांगली. | |
| ११. | सौ. कुसुम जगन्नाथ उपरे, मंजिरी अपार्टमेंट, ३६०अ, राधाकृष्ण वसाहत, सांगली. | |

स्थळ :- सांगली.

दिनांक :- ११-०८-१९९२.

वरील सह्या करणार इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

मधुकर शंकर कोष्टी,

Ma... Keshti,

खरी नक्कल.

निरीक्षक,

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय

सांगली विभाग सांगली

नक्कल मागणी अर्ज दि. १२.११.९२
नक्कल तयार दि. ०७.११.९२
नक्कल दिलेना दि. २५.११.९२
नक्कल फी मिळालेचा दि. २५.११.९२
छायांकित
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सांगली विभाग, सांगली.

परिशिष्ट - "क"

स्वकुळसाळी समाजसेवा मंडळ, सांगली, जि. सांगली
या संस्थेची नियम व नियमावली.

१] नियमावलीतील संदर्भित शब्दांची व्याख्या :-

संस्था :- या संस्थेच्या शब्दाचा अर्थ "स्वकुळसाळी समाजसेवा मंडळ, सांगली" असा राहील.

सभासद :- या शब्दाचा अर्थ संस्था नोंदणीसाठी केलेल्या अर्जात सामील असलेल्या व्यक्ती किंवा संस्था नोंदविल्यावर संस्था सदस्य म्हणून नियम क्रमांक ४ प्रमाणे दाखल करून घेतलेल्या व्यक्ती असा राहील.

पदाधिकारी :- या शब्दाचा अर्थ "संस्थेच्या नियमावलीस अनुसरून कार्यकारी मंडळाच्या कोणत्याही पदावर निवडलेला किंवा नेमलेली व्यक्ती असा राहील". त्यात अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यवाह, खजिनदार, सदस्य यांचा समावेश होतो.

अधिनियम :-या शब्दाचा अर्थ "संस्था नोंदणी अधिनियम १८६०".

अनुसूची :- संस्था नोंदणी [महाराष्ट्र] नियम १९५२ मध्ये असलेल्या अनुसूची.

२] कार्यक्षेत्र :-

सांगली जिल्हा.

३] हिशोबाचे वर्ष :- १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

४] सभासद व त्यांची नोंदणी पध्दत -

सदर संस्थेचे उद्देश, नियम व नियमावली मान्य असलेल्या व भारतीय नागरीक असलेल्या स्वकुळसाळी समाजातील १८ वर्ष पूर्ण केलेल्या कोणत्याही व्यक्तीस (स्त्री व पुरुष) सभासद होता येईल. त्यासाठी त्याने कार्यकारी मंडळाने विहीत केलेल्या नमुन्यांत अर्ज भरून तो सादर करणे आवश्यक आहे. सदर अर्ज मंजूर झाल्यावर त्या व्यक्तीस संस्थेचे सभासदत्व प्राप्त होईल. त्यानंतर त्याचे नांव सभासद नोंदवहीत म्हणजेच अनुसूची-सहा मध्ये नोंद करण्येत येईल. सभासदत्वाचा अर्ज मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. तथापी, नामंजूर केलेले अर्ज संमतीसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेत ठेवणे आवश्यक आहे व वार्षिक सर्वसाधारण सभेतील निर्णय अंतिम राहील.

.. २ ..

५] **सभासदाचे प्रकार :-**

१] आजीव सभासद :- जी व्यक्ती संस्थेला वर्गणी म्हणून एकरकमी रु. २०१/- [रु दोनशे एक मात्र] किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम देईल त्यास आजीव सभासद म्हणून समजले जाईल.

२] सामान्य सभासद - जी व्यक्ती रु. २४/- [रुपये चोवीस मात्र] किंवा त्याहून अधिक वर्गणी प्रतिवर्षी संस्थेस देईल त्यास सामान्य सभासद असे समजणेत येईल.

३] सन्माननीय सभासद :- सामाजीक, शैक्षणिक व धर्मादाय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व संस्थेविषयी विशेष आस्था व हितसंबंध असणा-या व्यक्तींना कार्यकारी मंडळ बहुमताने सन्माननीय सभासदत्व बहाल करील. या सभासदांकडून संस्थेसाठी आवश्यकती सर्व मदत घेता येईल. परंतु त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही तसेच त्यांना कार्यकारी मंडळाचे निवडणूकीत भाग घेता येणार नाही.

६] **सभासदत्व रद्द होणेबाबत :-**

खालील कोणत्याही कारणास्तव सभासदाचे सभासदत्व रद्द करणेचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

१] सभासद मृत्यू पावला असेलतर.

२] सभासदाने लेखी राजीनामा दिला असेलतर.

३] वार्षिक वर्गणी सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक काळ वेळेवर न भरल्यास.

४] सभासदाची वागणूक संस्थेच्या कार्यात घातक ठरत असेल, ज्ञापन नियम आणि नियमावली आणि कार्यकारी मंडळाने वेळोवेळी केलेले नियम, पोटनियम याचे उल्लंघन करणारी असेलतर. तथापी, अशाप्रकारे सभासदाचे सभासदत्व रद्द केल्यास त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे व अशा सभासदास त्याची बाजू मांडण्यास संधी दिली जाईल व याबाबत वार्षिक सर्वसाधारण सभेचा निर्णय अंतिम राहील.

७] <u>सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार आणि कार्ये :-</u>

सर्व सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा, हिशेबाचे वर्ष संपलेनंतर ९० [नव्वद] दिवसांचे आंत, कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या जागी, वेळी व दिनांकास होईल.

<u>अधिकार व कार्ये :-</u>

१] मागील वर्षाचा सर्वसाधारण व विशेष साधारण सभांचे अहवाल वाचून दाखविणे आणि मंजूरी मिळविणे.

२] कार्यकारी मंडळाने सादर केलेले व हिशोब तपासणीसांनी तपासलेले मागील वर्षाचे ताळेबंद व हिशोब यांच्या अहवालासह मंजूर करणे.

३] पुढील वर्षाचा अर्थसंकल्प मंजूर करणे.

४] नियम दुरुस्ती अगर नवीन नियम यांचा विचार करणे व मंजूर करणे/नामंजूर करणे.

५] कार्यकारी मंडळाची मुदत संपली असल्यास नवीन कार्यकारी मंडळाची पांच वर्षाकरिता निवड करणे, निवडणुका घेणे.

६] पुर्व सुचनानुसार आलेल्या विषयावर विचार करुन निर्णय घेणे.

७] अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे आलेल्या इतर कामांचा विचार करुन निर्णय घेणे.

८] <u>सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या :-</u>

वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना, सभेच्या तारखेपूर्वी किमान १५ [पंधरा] दिवस अगोदर सर्व सभासदांना पोस्टाने [यु.पी.सी] किंवा हस्तपोच घेऊन देणे आवश्यक आहे. सदर सुचनेमध्ये सभेचा विषय, स्थळ, वेळ, वार, दिनांक यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. काही कारणास्तव पाठविलेली सुचना सभासदांस मिळाली नाहीतर त्याचा परिणाम सभेवर होणार नाही किंवा सभेमध्ये घेतलेल्या निर्णयावर होणार नाही.

एकूण सभासद संख्येच्या १/२ [एक द्विदतांश] गणसंख्येने सभेचे कामकाज चालू करणेत येईल. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा एक तासानंतर त्याच ठिकाणी सभा घेणेत येईल. अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. वार्षिक सर्वसाधारण सभेचे निर्णय सर्व सभासदांना व कार्यकारी मंडळातील सर्व सभासदांना बंधनकारक राहतील.

९] विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये :-

काही महत्त्वाच्या कामासाठी कार्यकारी मंडळाने बोलाविलेली किंवा एकूण सभासदांच्या पैकी किमान २५ सभासदांनी कार्यकारी मंडळाकडे लेखी मागणी केल्यानुसार घेण्यांत आलेल्या सभेस विशेष सर्वसाधारण सभा असे संबोधण्यांत येईल. सदर सभा ज्या विषयासाठी बोलाविली असेल त्याच विषयावर चर्चा होईल. सदर सभेची सुचना पांच दिवस अगोदर सर्व सभासदांना पोस्टाने अगर हस्तपोच देण्येत येईल. सुचनेबरोबर सभेचा विषय, वेळ, वार व दिनांक कळविला जाईल. एकूण सभासद संख्येच्या १/२ [एक व्दितांश] इतक्या गणसंख्येने कामकाज चालू करणेत येईल. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा एक तासानंतर त्याच ठिकाणी सभा घेणेत येईल व अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. तथापी, तसा स्पष्ट उल्लेख नोटीसी मध्ये असणे आवश्यक आहे.

१०] संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना :-

संस्थेचा व्यवहार हा संस्थेच्या नियमावलीनुसार सुव्यवस्थित चालविणेसाठी ११ [अकरा] सभासदांचे एक कार्यकारी मंडळ राहील. सदर कार्यकारी मंडळात खालीलप्रमाणे पदाधिकारी राहतील.

| | |
|---|---|
| अध्यक्ष | १ [एक] |
| उपाध्यक्ष | १ [एक] |
| कार्यवाह | १ [एक] |
| खजिनदार | १ [एक] |
| सभासद | ७ [सात] |
| एकूण :- | ११ [अकरा] |

११] कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणूकीची पध्दत :-

निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाची मुदत ५ [पांच] वर्षाची राहील. संस्था नोंदणीचेवेळी असलेले कार्यकारी मंडळ संस्था नोंदणीपासून पांच वर्षाच्या कालावधीपर्यंत राहील. त्यानंतर कार्यकारी मंडळाची निवड दर पांच वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर मतदान पध्दतीने [हात वर करुन] होईल. निवडून आलेले सदस्य आपल्यातून कलम १० प्रमाणे पदाधिका-यांची निवड, निवड झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांचे आंत करतील. नवीन कार्यकारी मंडळ अधिकार पदावर येईलपर्यंत जुनेच कार्यकारी मंडळ अधिकार पदावर राहील.

१२] कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-

१] अध्यक्ष :-

अ] सर्व सभांचे अध्यक्षस्थान भूषविणे [वार्षिक सर्वसाधारण सभा, कार्यकारी मंडळाची सभा इ. सभा].

ब] सर्व सभांचे नियंत्रण करणे, सभांचे कामकाज नियम व नियमावलीनुसार चालविणे.

क] संस्थेच्या कार्यावर/कारभारावर देखरेख करणे/ठेवणे.

ड] समसमान मते पडल्यास निर्णायक मत देण्याचा अधिकार बजावणे.

इ] संस्थेच्या हितासाठी आवश्यकतया गोष्टी करणे.

२] उपाध्यक्ष :-

अ] अध्यक्षांना सर्व कामात मदत करणे.

ब] अध्यक्षांच्या गैरहजेरीत अध्यक्षांचे असलेले सर्वाधिकार उपभोगून संस्थेच्या सभांचे नियंत्रण करणे.

३] कार्यवाह :-

अ] कार्यकारी मंडळाचे आणि अध्यक्षांचे आदेशाचे पालन करणे.

ब] अध्यक्षांच्या पुर्वसुचनेनुसार संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा, विशेष सर्वसाधारण सभा व इतर सभा आयोजीत करणे व सभेत संमत झालेल्या ठरावांची अंमलबजावणी करणे.

क] सभेच्या कामकाजाचे पक्के टाचण करणे, ठेवणे तसेच कार्यवृ-त लिहिणे.

ड] संस्थेचा सर्व पत्रव्यवहार करणे.

इ] कार्यकारी मंडळाने सुचीत केल्याप्रमाणे सर्व कायदेशीर बाबीत मंडळाचे [संस्थेचे] प्रतिनिधीत्व करणे.

ई] वार्षिक सर्वसाधारण सभेचे वेळी होणा-या निवडणूकीसंबंधी जरूरती सर्व पूर्व तयारी करणे.

४] खजिनदार :-

अ] कार्यकारी मंडळाच्या आणि अध्यक्षांच्या आदेशाचे पालन करणे.

ब] संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.

क] वेळोवेळी संस्थेच्या नावे येणा-या रकमा [देणगी वर्गणी] इतर वस्तू स्विकारून त्याच्यारितसर पावत्या देणे.

ब] संस्थेच्या नावे जमा झालेल्या निधीचा, मिळकतीचा, इतर वस्तू व पैशाचा हिशोब सुव्यवस्थित ठेवणे व त्या संबंधात असणारे कागदपत्र सुव्यवस्थित ठेवणे.

इ] वार्षिक आढावा व हिशोब तक्ता तयार करुन तो तपासण्यासाठी हिशोब तपासणीसाकडे सादर करणे.

ई] तातडीच्या खर्चासाठी, किरकोळ खर्चासाठी खजिनदार यांचेकडे रु. २००/- [रु. दोनशे मात्र] ठेवणेत येतील.

१३] कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :-

दर तीन महिन्यातून एकदा कार्यकारी मंडळाची सभा घेण्यांत येईल.

विषेष जरुरीच्या कामासाठी किंवा कार्यकारी मंडळाच्या सहा सभासदांनी लेखी मागणी केल्यास जी सभा घेण्यांत येईल त्या सभेस मागणीची सभा असे संबोधण्यांत येईल.

१४] कार्यकारी मंडळाचे सभेची सुचना व गणसंख्या :-

१] कार्यकारी मंडळाचे सभेची लेखी सुचना, सभेच्या दिनांकाच्या किमान सात दिवस अगोदर, कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना पोस्टाने [यु.पी.सी.] किंवा हस्तपोच घेउन देणे आवश्यक आहे.

२] मागणीच्या सभेची लेखी सुचना, सभेच्या दिनांकाच्या किमान दोन दिवस आगोदर कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना पोस्टाने [यु.पी.सी.] किंवा हस्तपोच घेउन देणे आवश्यक आहे.

३] कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा या सभेसाठी सात सहा सभासदांची उपस्थिती, गणसंख्या समजणेत येईल. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास, त्याच दिवशी, त्याच ठिकाणी पुन्हा एक तासानंतर सभा घेणेत येईल. अशारितीने पुन्हा घेणेत आलेल्या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

१५] कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम :-

१] संस्थेचे सर्व सभासद दर पांच वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये कार्यकारी मंडळाची निवड करतील.

२] निवडणूकीची व्यवस्था अस्तित्वात असलेले कार्यकारी मंडळ करील.

असेल ती करेल.

८] आवश्यकतेनुसार [illegible] कर्मचारी नियुक्ती करणे व त्याचे विषयी नियम तयार करणे.

१८] संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग :-

वर्गणी, देणगी, सरकारी-निमसरकारी अनुदान व इतर मार्गाने जमा होणारी रक्कम, स्थावर व जंगम मालम-तेपासून होणारे उत्पन्न. सदरहू निधीचा विनियोग संस्थेचे उद्देश सफल करणेसाठी केला जाईल.

१९] उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतूद [टक्केवारीप्रमाणे] :-

| | | |
|---|---|---|
| उद्देश क्रमांक १ | :- | २० टक्के. |
| उद्देश क्रमांक २ | :- | १० टक्के. |
| उद्देश क्रमांक ३ | :- | १० टक्के. |
| उद्देश क्रमांक ४ | :- | ५ टक्के. |
| उद्देश क्रमांक ५ | :- | ३० टक्के. |
| उद्देश क्रमांक ६ | :- | १० टक्के. |
| उद्देश क्रमांक ७ | :- | १० टक्के. |
| उद्देश क्रमांक ८ | :- | ०५ टक्के |
| एकूण | :- | १०० टक्के. |

२०] कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद :-

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतूदीनुसार मा. धर्मादाय सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या पुर्वपरवानगीने संस्थेला, इतर कोणत्याही संस्थेकडून किंवा बँकेकडून कर्ज अगर ठेवी स्विकारता येतील.

२१] स्थावर मालम-ता खरेदी व विक्री करणेबाबतची तरतूद :-

संस्थेच्या गरजेनुसार आवश्यकता असेलस स्थावर मालम-ता खरेदी करावयाचे, संस्थेची असलेली अनावश्यक मालम-ता विकणेचे अधिकार कार्यकारी मंडळास राहतील. तथापी, स्थावर मालम-तेची विक्री करावयाची असलेस, कार्यकारी मंडळाने तसा ठराव वार्षिक/जादा सर्वसाधारण सभेत मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. तसेच विक्रीपूर्वी मा. धर्मादाय सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांची मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ३६/३६ तरतूदीनुसार परवानगी घेणे आवश्यक आहे.

२२] बँक खाते :-

संस्थेचा जमा होणारा निधी, संस्थेच्या नावे कोणत्याही सरकारमान्य बँकेत/शासन मान्यताप्राप्त सहकारी बँकेत अथवा पोस्टात खाते उघडून त्यांत ठेवणेत येईल. सदर खात्याचा व्यवहार अध्यक्ष, कार्यवाह व खजिनदार यापैकी कोणाही दोघांच्या सहीने चालेल. संस्थेचे मोठे व्यवहार शक्यतो बँकेमार्फत केले जातील.

२३] सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :-

सन १८६० चे संस्था नोंदणी अधिनियम चे कलम १५ अनुसार जे संस्थेचे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ चे संस्था नोंदणी नियमातील नियम १५ अनुसार अनुसूची क्रमांक ६ चे नमुनेत ठेवण्यांत येईल.

२४] नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतूद :-

नियम व नियमावलीत बदल करावयाचा असेल, वाढ करावयाची असेल तर संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये अगर विशेष सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित सभासदांच्या २/३ [दोन तृतांश] सभासदांच्या बहुमताने नियम व नियमावलीत बदल/वाढ करण्यांत येईल.

२५] संस्थेचे नांव व उद्देश यामध्ये बदल :-

संस्थेचे नांव अथवा उद्देश यामध्ये बदल करावयाचा असेलतर संस्था नोंदणी अधिनियम, १८६० चे कलम १२ व १२ अ च्या तरतुदीनुसार करणेत येईल.

२६] संस्थेचे विसर्जन :-

सभासदांच्या इच्छेने किंवा संस्था संपुष्टात येण्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्यास संस्था विसर्जीत करणेचा निर्णय तसेच मालम-तेच्या विल्हेवाटी बाबतचा निर्णय सर्वसाधारण सभेत एकूण सभासद संख्येच्या ३/५ [तीन ~~पंचम~~ पंचमांश] बहुमताने घेण्यांत येईल. सदरची कार्यवाही संस्था नोंदणी अधिनियम, १८६० चे कलम १३ व १४ चे तरतुदीनुसार करणेत येईल.

दाखला

प्रमाणित करण्यांत येते की, स्वकुळसाळी समाजसेवा मंडळ, सांगली या संस्थेची नियम व नियमावलीची सत्य प्रत आहे.

१] श्री. दिनकर गंगाराम डहाके, अध्यक्ष.
२] श्री. हणमंतराव ज्ञानदेव शिंगारे, उपाध्यक्ष.
३) श्री. (अप्पा) पांडुरंग गोडे, कार्यवाह.

खरी नक्कल,
अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सांगली विभाग सां.

TRUE COPY
Vice - Principal (PW),
Walchand College of Engineering,
SANGLI.

अहवाल दिनांक : २५/०७/२०१३

## गाव नमुना सात

### अधिकार अभिलेख पत्रक

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम , १९७१ यातील नियम ३, ५, ६ आणि ७]

गाव : वान्लेसवाडी    तालुका : मिरज    जिल्हा : सांगली

| गट क्रमांक | गट क्रमांकाचा उपविभाग | भूधारणा पदधती | भोगवटादाराचे नाव | |
|---|---|---|---|---|
| ३/५ | | बिन शेती | | |

| शेताचे स्थानिक नाव | क्षेत्र आकार आणे पै पो.ख. फे.फा. | खाते क्रमांक |
|---|---|---|
| हे. आर.चौ.मी.<br>अकृषिक क्षेत्र २८८.००.००<br>आकारणी ३३.८५<br>एकूण<br>पोटखराब (लागवडी अयोग्य<br>वर्ग (अ)<br>वर्ग (ब)<br>एकूण<br>आकारणी<br>जुडी किंवा विशेष आकारणी | *स्वकुळसाळी समाजसेवा मंडळ* (१९५६)<br>*सांगली तर्फे अध्यक्ष*<br>*दिनकर गंगाराम डहाके* (१९५६)<br>*सामायिक क्षेत्र* २८८.००.०० *आकारणी* ३३.८५<br><br>(२),(८८),(९२) | ५५०<br>कुळाचे नाव<br>इतर अधिकार<br>बिनशेती<br>(२)<br>इतर<br>चे.रघुवंश स.गृ.नि.सो.कुपवाड (९२)<br><br>सीमा आणि भूमापन चिन्हे |

## गाव नमुना बारा

### पिकांची नोंदवही

**[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम , १९७१ यातील नियम २९]**

| वर्ष | हंगाम | पिकाखलील क्षेत्रांचा तपशील: मिश्र पिका खालील क्षेत्र — मिश्रणाचा संकेत क्रमांक: जल सिंचित | अजल सिंचित | घटक पिके व प्रत्येका खालील क्षेत्र: पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | निर्भेळ पिकाखालील क्षेत्र: पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन: स्वरुप | क्षेत्र | जल सिंचनाचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | २०१२-१३ खरीप बिनशेत | २८८.००.०० | | |

**TRUE COPY**

व्यवस्थापक
संगणकीकृत ७/१२ केंद्र मिरज
सर्कल बुधगांव

Vice - Principal (PW),
Walchand College of Engineering
SANGLI.

Print Serial No 27350007/4350800020/1517

तलाठी कुपवाड.

अहवाल दिनांक : २५/०७/२०१३

# गाव नमुना सात

## अधिकार अभिलेख पत्रक

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम , १९७१ यातील नियम ३, ५, ६ आणि ७]

गाव : वान्लेसवाडी तालुका : मिरज जिल्हा : सांगली

| गट क्रमांक | गट क्रमांकाचा उपविभाग | भूधारणा पदधती | भोगवटादाराचे नाव | |
|---|---|---|---|---|
| ३/६ | | बिन शेती | | |
| शेताचे स्थानिक नाव | | | क्षेत्र आकार आणे पै पो.ख. फे.फा. | खाते क्रमांक |
| हे. आर.चौ.मी.<br>अकृषिक क्षेत्र२८१.७५.००<br>आकारणी ३३.१५<br>एकूण<br>पोटखराब (लागवडी अयोग्य<br>वर्ग (अ)<br>वर्ग (ब)<br>एकूण<br>आकारणी<br>जुडी किंवा विशेष आकारणी | | | *स्वकुळसाळी समाजसेवा मंडळ सांगली तर्फे अध्यक्ष* (१९५७)<br>*दिनकर गंगाराम डहाके* (१९५७)<br>*सामायिक क्षेत्र* २८१.७५.०० *आकारणी* ३३.१५<br>(२),(८८),(९२) | ५५०<br>कुळाचे नाव<br>इतर अधिकार<br>बिनशेती<br>(२)<br>इतर<br>चे.रघुवंश स.गृ.नि.सो.कुपवाड (९२)<br>सीमा आणि भूमापन चिन्हे |

# गाव नमुना बारा

## पिकांची नोंदवही

**[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम , १९७१ यातील नियम २९]**

| वर्ष | हंगाम | पिकाखलील क्षेत्रांचा तपशील: मिश्र पिका खालील क्षेत्र: मिश्रणाचा संकेत क्रमांक: जल सिंचित | अजल सिंचित | घटक पिके व प्रत्येका खालील क्षेत्र: पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | निर्भेळ पिकाखालील क्षेत्र: पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन: स्वरुप | क्षेत्र | जल सिंचनाचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | २०१२-१३ खरीप बिनशेत | २८१.७५.०० | | |

Print Serial No 273500074350800020/1518

TRUE COPY

व्यवस्थापक
संगणकीकृत ७/१२ केंद्र मिरज

Vice - Principal (PW),
Walchand College of Engineering
SANGLI.

तलाठी कुपवाड.